प्रति,

मा. ना. बबनरावजी पाचपुते साहेब
वन मंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय मुंबई - 400032

विषय - मौजे पागळोली ता. मावळ, जि. पुणे येथील जमीन गट नंबर 14 मधील अतिक्रमणा बाबत.

अर्जदार :- सौ. मधू प्रकाश कपूर,
रा. अपरडेक, रिझॉर्टस, ग. नं. 13 व 15
पागळोली, ता. मावळ, जि. पुणे.

महोदय,

कारणे विनंती अर्ज करते की,

मौजे पांगळोली, ता. मावळ, जि. पुणे येथील जमिनी गट नंबर 13 क्षेत्र 00 हे. 77 आर आणि गट नंबर 15 क्षेत्र 01 हे. 55 आर या जमिनी माझी व माझी मुलगी सौ. राधिका मेहरा या दोघींच्या मालकी वहिवाटीच्या आहेत. सदर जमिनीचे बिगर शेती वापरास आम्ही मा. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडून रितसर परवानगी घेवुन अकृषिक वापर सदर जमिनीचा सुरु केला आहे व सदर जमिनीमध्ये काही बांधकाम केलेले आहे जमिन खरेदी केल्यावर सरकारी मोजणी करुन घेतलेली होती व शासनाचे मोजणी खात्याकडून मिळालेल्या मोजणी नकाशाप्रमाणे मा. जिल्हाधिकारी यांचेकडून अकृषिक परवानगी मिळाले प्रमाणे आम्ही त्याचा सदर जमिनीमध्ये काही बांधकाम केलेले आहे आमचे मालकीच्या गट

माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.

(66)

नंबर 13 व 15 या जमिनीलगत शासनाचे वन विभागाचे ताब्यातील गट नंबर 14 ही जमीन असून त्याच्या हद्दीच्या खुणा सन 1919 च्या नकाशा प्रमाणे होत्या तथापी सन 1952-53 मध्ये ट्रायुलावशन पध्दतीने सर्व्हे होवुन प्रत्यक्ष जागेवर नव्याने हद्दीच्या खुणा न झाल्यामुळे व हद्दीचा नविन नकाशाप्रमाणे बदल्याने गट नंबर 14 चे क्षेत्र गट नंबर 13 व 15 मध्ये काही भाग येत असल्याचे वन खात्याकडून आम्हांस सांगण्यात आले आहे. त्यामुळे आम्ही आमची जमीन गट नंबर 13 व 15 मध्ये केलेले बांधकामाचा काही भाग वन विभागाच्या ताब्यात असलेल्या गट नंबर 14 मध्ये येत असल्याचे वन विभागाच्या कर्मचा-याकडून आम्हांस कळाले आहे. नविन मोजणी नकाशामध्ये बदल झाल्यामुळे आमचे बांधकामापैकी जो काही भाग गट नंबर 14 मध्ये येत असल्याचे आढळून येत आहे तेवढे क्षेत्रावर आम्ही मुद्दम अतिक्रमण करण्याचे उद्देशाने केलेले नव्हते व नाही पूर्वीच्या मोजणी नकाशाचे आधारे सदरचे बांधकाम आमचेकडून झालेले आहे. सबब आम्ही केलेल्या बांधकामापैकी जे काही क्षेत्राचे बांधकाम गट नंबर 14 चे हद्दीमध्ये येत आहे तेवढे क्षेत्र आमचेकडे मालकीने अथवा भाडेपट्टयाने देणे कामी महाराष्ट्र शासनाचे वन विभागास वनसंवर्धन अधिनियम 1980 ( सुधारीत ) मधील तरतुदीनुसार केंद्र सरकारकडे सदरचे क्षेत्र आमचेकडे ठेवण्यास परवानगी देणे कामी प्रस्ताव पाठविणे कामी आपलेकडून योग्य ते आदेश देण्यात यावेत सदरचे क्षेत्र आमचेकडे मालकीने अथवा भाडेपट्टयाने ठेवणे कामी शासनाकडून ज्या काही अटी शर्ती पाळण्यास तयार आहोत.

पुणे

ता 26-7-2005

आपले विश्वासू

Madhu Kapoor

माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.